# महात्मा गांधींचे शैक्षणिक विचार

शोधप्रबंध कर्ता
**धम्मप्रकाश श्रीपतराव वैद्य**
पदव्युत्तर गांधी विचारधारा विभाग
रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर-
मो. 8275039269
Email.-
dhammaprakash1966@gmail.com

---

***सार :***

*महात्मा गांधींच्या शैक्षणिक तत्वज्ञानात निसर्गवाद, आदर्शवाद, वास्तववाद आणि कार्यवाद अशा चारही पंथाचा सुरेख समन्वय झालेला दिसुन येतो. सामाजिक व आर्थिक बदल घडून येत असलेल्या समाजापासून शिक्षण दूर राहू शकत नाही असे त्यांचे मत होते. शिक्षणाच्या प्रक्रियेत 3H चे सुयोग्य स्थान पहिल्यांदा गांधीजींनी निर्धारित केले. हीच त्यांच्या शैक्षणिक तत्वज्ञानातील शिक्षण क्षेत्रास मिळालेली देणगी आहे. त्यांचे शैक्षणिक विचार सत्य, प्रेम, ओमल्याण, चारित्र्य निर्मिती, अहिंसेच्या शासन तत्वावर आधारित आहे*

---

**प्रस्तावना :**

महात्मा गांधींनी मांडलेल्या शिक्षण पध्दतीला मुलभूत शिक्षण किंवा वर्धा शिक्षण पध्दती म्हणतात. गांधीजींची शिक्षण पध्दती हे त्यांच्या शिक्षणाच्या तत्वज्ञानाचे व्यावहारिक मूर्त स्वरूप होते. त्यांचे मुलभूत शिक्षण विद्यार्थ्यांना नैतिकदृष्ट्या-सुदृढ, वैयक्तिकरित्या स्वतंत्र्य, सामाजिकदृष्ट्या रचनात्मक, आर्थिकदृष्ट्या उत्पादक आणि जबाबदार भविष्यातील नागरिक बनविण्यासाठी तयार करण्याचे आव्हानात्मक काम करते. गांधीजींचा असा विश्वास होता की शिक्षणाने मुलाच्या सर्व क्षमता विकसित केल्या पाहिजेत. गांधीजीनी स्पष्ट केले की शिक्षण म्हणजे मुलांच्या आणि माणसाच्या शरीरातील, मनातील आणि आत्म्यामधील सर्वोत्तम गोष्टीचे सर्वांगीण आकलन देशाची प्रगती साधायची असेल तर त्या प्रगतीचा आत्मा म्हणजे शिक्षण होय. या त्यांच्या विचारातून शिक्षणाबद्दलची त्यांची आस्था स्पष्ट होते.

**उद्दिष्ट्ये :**

1. महात्मा गांधीजीची वर्धा शिक्षण योजना समजून घेणे
2. महात्मा गांधीच्या शैक्षणिक विचारांचा आशय समजून घेणे
3. महात्मा गांधीच्या शैक्षणिक विचारांची प्रासंगिकता पाहणे.

**तथ्य संकलन :**

प्रस्तुत संसोधन लेखासाठी माहिती संकत्रित करण्यासाठी विषयांशी संबधित ग्रंथ, पुस्तके, लेख, शोधपत्र आणि वेगवेगळ्या वेबसाईडचा वापर करण्यात आला आहे.

**गृहीतके :**

1. महात्मा गांधीनी मुलभूत शिक्षणावर जोर दिला आहे.
2. महात्मा गांधीना शिक्षणातून व्यक्तीचा सर्वांगिण विकास अपेक्षित आहे
3. महात्मा गांधीची शिक्षण योजना हस्तव्यवसायाला प्राधान्य देणारी आहे.
4. महात्मा गांधीच्या मुलोद्योगी शिक्षणामध्ये स्वावलंबन आणि समवायाची तत्वे आहेत.

**आशय विश्लेषण :**

**1) वर्धा शिक्षण योजना :**

गांधीजीनी वर्धा येथे 23 व 24 ऑक्टोबर 1937 मध्ये एक शैक्षणिक परिषद आयोजित केली होती. येथे त्यांनी आपले शिक्षण विषयक विचार मांडले होते. या परिषदेला विनोबा भावे . झाकीर हुसेन, काकासाहेब कालेलकर, दादा धर्माधिकारी, बाळासाहेब खैरे व अन्य मान्यवर उपस्थित होते. या सर्वांनी येथील परिषदेमध्ये विचार मंथन करुन एक शिक्षण योजना तयार केली त्यालाच मुलोद्योग शिक्षण योजना अथवा वर्धा शिक्षण योजना अथवा नई तालीम या नावाने ओळखले जाते. साद्वारे एक उदात्त आणि स्वच्छ हेतू डोळयासमोर ठेऊन राष्ट्राला एक नवीन शिक्षण योजना देण्याचा प्रयत्न महात्मा गांधी यांनी केला ज्यामध्ये देशातील सात ते चौदा वर्षे वयोगटातील प्रत्येक मुलाचे शिक्षण मोफत, सक्तीचे आणि सार्वत्रिक असले पाहिजे. मातृभाषा हेच शिक्षणाचे माध्यम असावे उत्पादक उद्योगाद्वारे शिक्षण देणाची योजना असावी म्हणजे हस्त कौशल्याधारित शिक्षण देण्याची विद्यार्थ्यांना देण्यात यावे सह शिक्षणाने मुलांमध्ये मानवी मूल्ये विकसित केली पाहिजेत्त शिक्षणाने उपयुक्त जवाबदार आणि गतिमान नागरिक घडवले पाहिजेत. शिक्षणाद्वारे मुलाच्या सर्व लपलेल्या शक्ती तो ज्या समुदायाचा अविभाज्य भाग आहे त्यानुसार विकसित झाल्या पाहिजेत्त. शिक्षणाने मुलाचे शरीर, मन आणि आत्मा यांचा सुसंवादी विकास साधला पाहिजे. इत्यादी गोष्टींना महत्व देण्यात आले होते.

**2) मातृभाषा हे शिक्षणाचे माध्यम :**

आपले विचार, विषयाबद्दलच्या संकल्पना स्पष्टपणे विकसित करण्यासाठी मातृभाषेतून शिक्षण देणे आवश्यक आहे. मातृभाषेतून शिक्षण हाच शिक्षणाचा पाया आहे व त्यातून विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासास बराच वाव मिळतो असे गांधीजी म्हणतात. प्रत्येक प्रादेशिक भाषेचे महत्व वाढवण्यासाठी यांच्याच मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण विद्यार्थ्यांना द्यावे जेणेकरून विद्यार्थ्यांची मानसिक, वैचारिक आणि सांस्कृतिक वाढ योग्य प्रकारे होईल असे गांधीजींचे मत होते. गांधीजीनुसार मातृभाषेतून शिक्षण घेणाऱ्या व्यक्तीच्या सृजनात्मकतेला वाव मिळतो आणि समाज निर्मितीत तो महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडु शकतो.

**3) स्वावलंबी शिक्षण :**

गांधीजीच्या मते शिक्षणाद्वारे मुलाला भविष्यातील जीवनातील गरजा पूर्ण करण्यासाठी काही उद्योग किंवा व्यवसाय स्वीकारून उत्पादक कला शिकता आली पाहिजे म्हणूनच त्यांनी शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट्य स्वावलंबी शिक्षण आणि उपजीविका कमावण्याची क्षमता निर्माण करण्याचे समर्थन केले. शिक्षणाच्या मुलभूत तत्वांपैकी एक म्हणजे काम आणि ज्ञान कधीही वेगळे करता कामा नये. या विचाराचे गांधीजी होते. शिक्षण आणि श्रम वेगळे केल्याने सामाजिक अन्याय होतो. गतिमान समाजात शिक्षणाने व्यक्तींना बदलल्या परिस्थितीशी जुडवून घेण्यासाठी आणि सामाजिक बदलाच्या कार्यात रचनात्मक सहभाग घेण्यासाठी आवश्यक कौशल्ये आणि दृष्टीकोण दिले पाहिजेत. तरुणांमधील निराशा, नैराश्य चिंता किंवा आत्महत्या करण्याची भावना या समस्या सोडवण्यासाठी हे उपयुक्त बनु शकते.

**4) प्रौढ शिक्षण :**

लहान मुलांबरोबरच प्रौढांनाही शिक्षण देऊन साक्षर केले पाहिजे असे गांधीजीचे मत होते. कारण शिक्षण घेतल्यामुळे आत्मविश्वास वाढतो. समाजातील अज्ञान आणि अंधश्रद्धेला आढा घालण्यासाठी प्रौढ शिक्षणाची आवश्यकता आहे. प्रौढ शिक्षणामुळे प्रौढ स्वावलंबी बनतील. त्यांच्या जीवनात येणाऱ्या समस्या व अडचणी ते सोडवू शकतील म्हणून खेड्यातील लोकोच्या दैनंदिन गरजांशी निगडीत रोजच्या व्यवहारात उपयोगी ठरेल असे शिक्षण त्यांना दिले पाहिजे. प्रौढ शिक्षणातून व्यावहारिक ज्ञान त्यांना मिळाले पाहिजे असे महात्मा गांधींना वाटत होते. केवळ अक्षर ज्ञान न मिळता श्रमाच्या सहाय्याने त्यांचे व्यवहार सुरळीत चालण्यासाठी प्रौढांना कौशल्याधारित शिक्षण शिकावे असे त्यांना वाटत होते.

**5) स्त्री शिक्षण :**

स्त्रीला केवळ भोगदासी न मानता सखी, सहचारिणी मानून त्यांना बालसंगोपन, स्वच्छता, आहारशास्त्र, कुटुंब उपयोगी ठरेल असे शिक्षण द्यायला हवे असे महात्मा गांधी म्हणतात कारण पुरुषांबरोबर स्त्रियांनाही शिक्षणाची तितकीच गरज आहे. त्यांनाही पुरुषांच्या बरोबरीने संधी मिळाली तर समाजाच्या विकासाला गती मिळेल यावर महात्मा गांधींचा विश्वास होता. स्त्री-पुरुष समानतेसाठी व एकंदरीत कुटुंबाच्या प्रगतीसाठी स्त्रिया शिकल्याच पाहिजे असे गांधीजींना वाटत होते. अनिष्ट रुढी, प्रथा, परंपरा यामुळे भारतातील स्त्री ही अशिक्षित राहिली म्हणून स्त्री शिक्षण ही काळाची गरज आहे असे गांधीजीचे मत होते. त्यांनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केलेला होता.

**6) धार्मिक शिक्षण :**

विद्यार्थ्यांच्या मनामध्ये सर्वधर्मसमभाव निर्माण होण्यासाठी, सहिष्णूता वाढीसाठी आणि सद्गुणांचा विकास होण्यासाठी धार्मिक शिक्षणाची आवश्यकता आहे असे महात्मा गांधींना वाटत होते. केवळ आपलाच धर्म श्रेष्ठ आणि इतर धर्म कनिष्ठ अथवा दुय्यम अशी शिकवण मुलांना देण्यात येऊ नये. प्रत्येक धर्माचा अभ्यास केल्यामुळे त्या धर्मातील चांगल्या तत्त्वज्ञानाची माहिती विद्यार्थ्यांना मिळते. धार्मिक शिक्षणाचे कार्य धार्मिक संस्थानी करावे. आई वडीलांनी आपल्या मुलांना धर्मग्रंथाची ओळख करुन दयावी. या सर्व गोष्टीमुळे मुलांच्या

आत्मिक वा अध्यात्मिक विकास होतो असे गांधीजींना वाटत होते.

**7) विद्यापिठीय शिक्षण :**

1921 मध्ये गुजरात विद्यापीठाच्या स्थापनेच्या निमित्ताने आपले विचार व्यक्त करतांना गांधीजी म्हणाले शाळा, महाविद्यालय हे चारित्र्य संवर्धनाची केंद्र असायला हवी. शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांमध्ये देशासाठी सर्वतोपरी त्यागाची वृत्ती निर्माण व्हायला हवी. विविध क्षेत्रात उच्च विद्यापिठीय शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांमध्ये आपापल्या क्षेत्रातील समाज उपयोगी व राष्ट्रहिताच्या कार्यासाठी शिक्षण प्रणालीचा उपयोग झाला पाहिजे. विद्यापिठीय शिक्षण प्रणाली व राष्ट्रीय गरजांचा खुप निकटचा संबंध असतो असे गांधीजी मानतात.

**8) शारिरीक शिक्षण :**

शारिरीक शिक्षणाला बौध्दिक शिक्षणाच्या बरोबरीचे स्थान दिले पाहिजे. शरीर निरोगी व सुदृढ तरच लक्षपूर्वक व स्वतंत्रेने काम होईल. त्यासाठी शरीरश्रमाला विशेष महत्व आहे असे गांधीजी म्हणत. जितके शरीर चांगले तितकेच मन चांगले राहील. सुदृढ शरीर असेल तर विद्यार्थी अधिक कार्यक्षम व कुशल होण्यास मदत होते म्हणून शरीर श्रमाला शिक्षणात महत्त्वाचे स्थान असले पाहिजे. शारिरीक शिक्षणामुळे विद्यार्थी निरोगी बनतो, त्याच्या शरीराचा योग्य विकास होतो, सोबतच त्याच्या बौध्दीकतेचाही चांगला विकास होतो त्यामुळे शारिरीक शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो असे गांधीजींचे ठाम मत होते.

**9) नैतिक शिक्षण :**

महात्मा गांधीनी नैतिक शिक्षणाच्या महत्वावर जोर दिला नैतिक शिक्षणामुळे लोकांचे चारित्र्य विकसित करण्यासाठी आणि समाजात सकारात्मक योगदान करण्यासाठी मदत होते. म्हणून गांधीजीनी नैतिक शिक्षणाला चरित्र निर्माण करण्याच्या साधनाच्या स्वरुपात बघितले. गांधीजींनी नैतिक मुल्ये जसे सत्य, अहिंसा आणि सहानुभूती यांच्या विकासावर तसेच आत्म नियंत्रणाच्या महत्वावर भर दिला त्यामुळे व्यक्ती आपले विचार आणि कार्य याला नियंत्रित करु शकेल.

**10) शिक्षक विद्यार्थी संबंध :**

गांधीजींनी शिक्षकांना मुलांचे मार्गदर्शक व प्रेरणास्थान मानले. शिक्षकांनी मुलांचे हृदय (भावनात्मक विकास) आणी आत्मा (नैतिक विकास) विकसित करणे आवश्यक आहे. चारित्र्यसंपन्न नैतिकमूल्ये आत्मसात केलेला विद्यार्थी निर्माण करणे हे शिक्षकाचे उद्दिष्ट असले पाहिजे असे गांधीजी आवर्जुन सांगत. शिक्षकांनी मुलासाठी एक आदर्श निर्माण करावा असे त्यांचे मत होते.

**11) हरिजन शिक्षण :**

शिक्षणाच्या बाबतीत धर्म, जात, गोत्र, पंथ, वर्ण व उच्चनीच हा भेदभाव नष्ट करुन गांधीजींनी सर्व समाजाला शिक्षण यावयाचे होते. म्हणून प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत शिक्षण देणाऱ्या शाळा

कॉलेजचे दरवाजे हरिजनांसाठी उघडे राहिले पाहिजेत अशी गोधीजींची इच्छा होती. हरिजनांना प्राथमिक शिक्षण देतांना कसे खावे, कसे बसावे, कसे कपडे घालावेत; नाक, कान, दात नख व डोळे यांची निगा कशी राखावी व आपली शान व घर कसे स्वच्छ ठेवावे या गोष्टींचे शिक्षण द्या असा गांधीजीचा आग्रह होता.

**12) लैंगिक शिक्षण :**

गांधीजीच्या मते मुलांना जननेन्द्रियांचे कार्य व उपयोग याबद्दल माहिती देणे आवश्यक आहे. योग्य वेळी अशी माहिती दिली गेली तर मुले वामचरनाला प्रवृत्त होतात. त्यासाठी त्यांना लैंगिक शिक्षण देणे गरजेचे आहे. लैंगिक शिक्षणाचा प्रमुख हेतू कामवासनेवर विजय मिळवणे किंवा काम प्रवृत्तीचे उच्चयन करने हा असला पाहिजे. कामवासनेवर विजय मिळविल्याशिवाय मनुष्याला स्वतःवर नियंत्रण राखता येणार नाही आणि आत्म संयमाखेरीज स्वराज्यही मिळणार नाही असे गांधीजींचे मत होते.

**निष्कर्ष :**

1. महात्मा गांधीजींना शिक्षणातून व्यक्तीचा सर्वांगीण विकास अपेक्षित होता
2. शिक्षण हे मातृभाषेतून असावे व ते मोफत व सक्तीचे असावे अशी धारणा होती.
3. महात्मा गांधीजींची शिक्षण योजना हस्तव्यवसायास प्राधान्य देणारी होती.
4. महात्मा गांधीजींच्या मुलोद्योगी शिक्षणामध्ये स्वावलंबन आणि समवायाचे तत्व होते.

**समारोप :**

सत्य आणि अहिंसेची शिकवण सर्व जगाला देणाऱ्या महात्मा गांधी यांनी शिक्षण क्षेत्रामध्ये विविध प्रयोग करण्याचा प्रयत्न केला. भारत मातेला स्वतंत्र करण्यासाठी तळमळणारी व्यक्ती केवळ राजकीय क्षेत्रातच सक्रीय नव्हती तर स्वतंत्र भारताला विकसित करण्यासाठी शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे जाणून शैक्षणिक क्षेत्रातही तेवढीच सक्रीय होती. एका निर्धन राष्ट्राला शिक्षणातून स्वावलेबी, सज्ञान व सतेज बनविल्यासाठी गांधीजीनी जी शैक्षणिक योजना राष्ट्राला दिली त्यातच त्यांचे युगप्रवर्तक आहे. गांधीजीचे शिक्षण विषयक विचार आजही शिक्षण क्षेत्रात मार्गदर्शक आहेत. त्यांचे विचार आपल्याला एक चांगली आणि अधिक न्यायपूर्ण समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी प्रेरित करते.

**संदर्भ :**


- शाह पी. के. मुलभूत शिक्षण आणि त्यांची प्रासंगिकता यावर गांधीजीचे विचार - पूणे रिसर्च ॲण्ड इंटरनॅशनल जर्नल इन इंग्लीश चंड उ अके 4- 2017
- घोरमोडे के.यु. शैक्षणिक विचारवंत, विद्या प्रकाशन नागपूर- 1998
- अहेर हिरा- उद्योन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक, विद्या प्रकाशन नागपूर - 1945
- पवार नाग - शिक्षण क्षेत्रातील विचारवंत- नूतन प्रकाशन पूणे-2004
- 3) सक्सेना एस. शिक्षणाची तत्वे सुर्या प्रकाशन, मीरत

- विजयालक्ष्मी एन आणि इतर - शब्बा शतकातील गांधीवादी
- तत्वज्ञानाची प्रासंगिकता इंटरनैशनल जर्नल ऑफ रिसर्च इंजिनिअरिंग आय टी ॲण्ड सोशल सायन्स घेड ८ अंडे J, 2016 13
- महात्मा गांधीचे शैक्षणिक विचार - डॉ मृती टेंडन, रिसर्च पेपरा
- महात्मा गांधीचे शैक्षणिक विचार- डॉ. संजय जिरे, रिसर्च पेपर
- महात्मा गांधी यांच्चा शिक्षणाविषयी विचारांची प्रासंगिकता - डॉ. बी. ए. पवळे-वे डॉ. एस के लेखणे- नांदेड
- गांधी गो-१- माझे सत्याचे प्रयोग - नवजीवन प्रकाशन, अहमदाबाद